MHAU080005782019

दाखल दिनांक :– १६.०३.२०१९.

नोंदनी दिनांक :– १६.०३.२०१९.

निकाल दिनांक :– १३.०८.२०२६.

**कालावधी :– ०७ वर्ष, ०४ महिने, २९ दिवस.**

# सिल्लोड येथील ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांच्या न्यायालयात

( पिठासीन अधिकारी – श्री. ए.एच.तट्ट )

**नियमित दिवाणी दावा क्र.६७/२०१९.** **निशाणी क्र.१२.**

**शेख अब्दुल रशिद अब्दुल कदीर,**

वय – २५ वर्षे, धंदा – शिक्षण,

रा. अंबादास प्रशाद नगर सिल्लोड,

ता. सिल्लोड. जि. औरंगाबाद. ..... **वादी.**

**विरुध्द**

**शेख जबीन अ. रशिद,**

वय – २० वर्षे, धंदा – घरकाम,

रा.शेख खालीक शेख कलंदर,

रा. उतरान, ता. एरंडोल, ता.जि.जळगाव. ..... **प्रतिवादी.**

**दावा – मुस्लीम कायद्याचे कलम २८१ (१) प्रमाणे नांदण्यास येणे बाबत.**

---

**वादी साठी वकील :– श्री. आय. आय. पठाण.**

**प्रतिवादी वकील साठी :– श्री. एस. के. ढाकरे.**

---

13/8/26

## -: न्यायनिर्णय :-

## (दिनांक १३.०८.२०२६ रोजी घोषित)

वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीच्या विरोधात मुस्लीम कायद्याचे कलम २८१ (१) प्रमाणे वैवाहिक जीवनाची पुनःस्थापना करण्यासाठी नांदण्यास येणे बाबत दाखल केलेला आहे.

### वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, वादी व प्रतिवादी यांचे लग्न मुस्लीम धर्माच्या रितीरिवाजा प्रमाणे दि.०५.०५.२०१६ रोजी झालेले असून सदर लग्न संबंधातून प्रतिवादीला वादीपासून एक अपत्य नामे खनसा झालेली आहेत. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत. प्रतिवादीच्या आई-वडिलांनी वादीस लग्नाच्यावेळी कुठलेही दाग दागिने दिलेले नाही. लग्नानंतर प्रतिवादीने ४ ते ५ महिने वादी यांचे चांगल्याप्रकारे संसार केला परंतू प्रतिवादी ही वादी यास म्हणत असे की, '' तूमचे औरंगाबाद येथे शिक्ष्ज्ञण चालू असलयामुळे तुम्हाला माझेकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही त्यामुळे मी घरामध्ये एकटी पडते मला घ्झरी काहीच करमत नाही, येथे माझे आई वडील, भाऊ बहीण मला भेटण्यासाठी येत नसल्यामुळे मला एकटेपणाची जाणीव होत असते त्यामुळे तूमचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत मला माझ्या माहेरी राहू द्या'' असा सदैव प्रतिवादी आग्रह करीत असे.

३. वादीचे पुढे कथन असे की, दरम्यानच्या काळात प्रतिवादी ही वादी याचे पासून गरोदर राहील्यानंतर बाळंतपणाच्या आगदे प्रतिवादी ही तिच्या आग्रहाखातर तिच्या

13/8/26

मोजे तिच्या आई वडिलांकडे पाठविल्यानंतर दिनांक २३.०८.२०१७ रोजी कु. खनसा नावाची मुलगी झाली. त्यानंतर वादी व तयाचे घरातील नातेवाईकांना निरोप मिळाल्यानंतर खनसा हीस सोन्याची अंगठी, पायातील चांदीची चैन, हातातील चांदीच्या मनगट्या इत्यादी दागिने घेऊन वादी व त्याचे घरातील नातेवाईक प्रतिवादी हीस भेटण्यासाठी दिनांक ०१.०९.२०१७ रोजी प्रतिवादी हिचे माहेरी गेल्यानंतर तिची आई म्हणााली की, '' तूम बोलते थे की, हम सिल्लोड के बहोत बडे व्यापारी है, लेकीन तुम तो बहूत कंजूश निकले, बेटी को कुछ भी नही लाया, मेरी बेटल के शादी पहेले मालूम होत था तो मै मेरी बेटी तुम्हारे घर मे नही देती थी, तुमने हमारी बेटी को धोका दिया, अब मैमेरी बेटी को आपके घर मे कभी भी नही भेजूंगी, वक्त आया तो, हमारे रिश्तेदार मे से देखकर मै मेदी बेटी की दुसरी शादी कर दुंगी, लेकीन तुम्हारे घर मे मेरी बेटी नही भेजूंगी'' अशा प्रकारे अपमानित करुन वादी व त्यांचे घरातील लोकांना मुलीचे तोंडही बघू न देता हाकलून दिले. वादी याच्या आईने सोबत आणलेले सर्व दागिने प्रतिवादी हिच्या आईच्या हातात सोपवून परत आले.

४. वादीचे पुढे कथन की, त्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्या नातेवाईक कय्युम खान शब्बीर खान रा. सिल्लोड यांनी प्रतिवादीचे वडील यांना समजावून सांगितले. त्यानंतर वादी व त्याच्या नातेवाईकांनी प्रतिवादीस तिच्या माहेरी जाऊन पुन्हा नांदविण्यासाठी घेऊन आले. परंतु प्रतिवादी क्षुल्लक कारणवरुन या ना त्या कारणाने घरामध्ये वादविवाद निर्माण करीत असे. वादी याच्या घरातील लोकांना वाटले की, प्रतिवादी हिच्या वागण्यात आज ना उद्या बदल होईल म्हणून प्रतिवादी हिच्या वागण्याकडे दुर्लक्ष करुन मुलगी खनसा हिच्याकडे

ATavy
13/8/20

पाहून सर्व त्रास सहन करु लागले. त्यानंतर प्रतिवादी हिने दिनांक ०७.०७.२०१८ रोजी वादी याचे सोबत क्षुल्लक कारणावरुन प्रतिवादी हिने पुन्हा भांडण केले व वादी यास म्हणाली की, तुम्ही व मी माझे माहेरी उतरन येथे राहण्यास जाऊ'' त्यावेळी वादी व त्याचे घरातील लोकांनी समजाविण्याचा प्रयत्न केला परंतू, प्रतिवादी हिने काही एक ऐकूण घेतेले नाही. त्यानंतर तिने तिच्या वडिलांना फोन लावून बोलावून घेतले. प्रतिवादी हिच्या वडिलांनी देखील सांगितले की, वादी यास प्रतिवादी सोबत उतरन येथे पाठवा तो त्याचे शिक्षण जळगाव येथे घेईल व आमच्या घरी तो राहील. त्यानंतर प्रतिवादी ही वादी व त्याच्या घरातील लोकांची परवानगी न घेता तिच्या वडिलांसोबत निघून गेली.

५. वादीचे पुढे कथन की, त्यानंतर वादी व त्याचे घरातील लोकांनी प्रतिवादी व तिच्या वडिलांचा राग शांत होईपर्यंत तसेच वादी व प्रतिवादी यांच्या उज्ञवल भविष्याचा विचार करुन पुन्हा तिला दिनांक १०.०३.२०१९ रोजी दुपारी ०२.०० पवाजता तिच्या माहेरी जाऊन प्रतिवादी हिला नांदावयास प्रतिष्ठीत लोक व नातेवाईक यांना सोबत घेऊन गेले असता प्रतिवादी हिच्या वडिलांने वादी व त्याचे घरातील लोकांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व म्हणाला की, ''तूम अगर मेरी बेटी को जबरदस्ती लेकर गऐ तो मैं मेरी बच्ची चाकू मारके तुम्हे तुम्हारा नात बताकर तुम्हारे खिलाफ पोलीस स्टेशन में फिर्याद दे दुंगा'' असे म्हणून वादी व त्याच्या घरातील लोकांना मारहाण करुन शिवीगाळ केली. म्हणून सदरचे प्रकरण दाखल करण्यास कारण घडले.

६. वादीचे पुढे कथन की, वादीचे प्रतिवादी व मुलगी खनसा हिच्यावर जिवापाड प्रेम

ATavy
13/8/20

असून प्रतिवादी सोबत संसार करण्याची इच्छा आहे. परंतु प्रतिवादी ही तिच्या हट्टावर कायम ठाम असल्यामुळे वादी यांना प्रचंड शारीरिक व मानसिक त्रास होत आहे. वादी व प्रतिवादी यांचे वैवाहिक संबंध संपुष्टात येऊ नये, म्हणून वादी व प्रतिवादी यांचे वैवाहिक संबंध पुर्नस्थापन होणे गरजेचे आहे. त्यासाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

७. दाव्याच्या आदेशीकेची प्रतिवादीस बजावणी होऊन प्रतिवादी त्यांच्या विधिज्ञांमार्फत हजर झाले. सदरील दाव्यात त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी वेळ मागितला. परंतु, विहीत मुदतीत त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्यामुळे दिनांक ०६.०८.२०१९ प्रतिवादी विरुध्द दावा विना म्हणणे चालविण्यात आला. त्यानंतर देखील वेळोवेळी प्रतिवादींना पुरावा देण्यासाठी व सदरील दाव्यामध्ये युक्तीवाद करण्यासाठी पुरेशी संधी दिली. सबब, प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही व युक्तीवाद नाहीचा आदेश पारित करण्यात आला.

८. वादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्यातील व वादीच्या शपथपत्रातील कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारासाठी निघतात. मी त्या मुद्यांचे निष्कर्ष कारणेमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी ही कोणतेही कारण नसताना वादी सोबत नांदण्यास नकार देत असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | .. होय. |
| २. | वादी हा वैवाहीक संबंध पुर्नस्थापन करण्यासाठी पात्र आहे काय ? | .. होय. |

13/8/20

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश व हुकूमनामा काय ? | **.. दावा मंजूर करण्यात येत आहे.** |

**<u>-: निष्कर्षाची कारणेमिमांसा :-</u>**

९. वादीने त्याच्या दाव्यातील कथने सिध्द करण्यासाठी स्वतःचा पुरावा (नि.क्र.९) वरती दिलेला आहे. त्यानंतर वादीने (नि.क्र.१०) प्रमाणे त्याला अतिरिक्त पुरावा देणे नसल्याबाबत पुरशीस सादर करुन त्याचा पुरावा बंद केलेला आहे. सदर दावा हा प्रतिवादीच्या विरोधात एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे प्रतिवादी तर्फे कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही.

**<u>-: मुद्दा क्र.१ आणि २ साठी :-</u>**

**१०.** मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्याची व चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत. भारतीय पुरावा कायद्याचे कलम १०१ मध्ये शाबीतीची जबाबदारी कोणावर असते याबाबत सांगितलेले आहे. सदर कलमाप्रमाणे जो, स्वतः केलेल्या प्रपादन तथ्यांच्या अस्तित्वात अवलंबून असलेल्या कोणत्याही वैध हक्काबाबत किंवा दायित्वाबाबत न्यायनिर्णय देण्यास कोणत्याही न्यायालयास विनंती करील, त्याने ती तथ्ये अस्तित्वात असल्याचे शाबीत केले पाहिजे. त्यामुळे वादीवर त्याचे कथन सिध्द करण्याची जबाबदारी आहे.

**११.** वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम ४ प्रमाणे शपथपत्राद्वारे त्याचा पुरावा (नि.क्र.८) वरती सादर केलेला आहे. वादीने त्याच्या दाव्यातील सर्व कथने

13/8/25

त्याच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेली आहेत. त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ती पुन्हा या ठिकाणी नमूद करण्यात आलेली नाहीत. प्रतिवादीने वादीची कथने व दिलेला पुरावा पुरेशी संधी देवून देखील दाव्यात हजर होऊन लेखी कैफीयत दाखल करुन अथवा वादीचा उलटतपास घेऊन खोडून काढलेली नाहीत. याउलट प्रतिवादीने तिला वादी सोबत राहणे शक्य नसल्याबाबतचा कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे वादीची कथने व पुरावा हा विनाअव्हानीत राहत असल्यामुळे वादीच्या साक्षीवर अविश्वास दाखवावा अशी कोणतीही बाब पटलावरती आलेली नाही. तसेच वादीने प्रतिवादीला नांदावयास यावे याकरीता प्रयत्न करुन देखील ती वादीसोबत नांदवयास येत नसल्याने तिची वादीसोबत नांदण्याची ईच्छा नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पटलावरील पुराव्यावरुन प्रतिवादी ही कोणतेही सबळ कारण नसताना वादीपासून वेगळे राहून त्याच्या सोबत नांदण्यास नकार देत असल्याचे सिध्द होत आहे. तसेच वादीने दावा दाखल करण्यास दाखवलेले कारण देखील प्रतिवादीने नाकारलेले नाही. यावरुन प्रतिवादी ही कोणतेही कारण नसताना वादी सोबत नांदण्यास नकार देत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वैवाहिक जीवणासाठी जोडीदाराची आवश्यकता असल्यामुळे व वादी व प्रतिवादी मधील पती–पत्नीचे नाते संबंध कायम असल्यामुळे वादी ची मागणी ही संयुक्तीक आहे. त्यामुळे ती मान्य होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ आणि २ साठीचा निष्कर्ष होकारार्थी असा नोंदवत आहे.

**<u>–: मुद्दा क्र.३ करीता :–</u>**

**१२.** मुद्दा क्र.१ आणि २ च्या वर नमूद निष्कर्षांचा विचार करता प्रतिवादी ही कोणतेही

13/8/25

सबळ कारण नसताना वादी सोबत नांदण्यास नकार देत आहे. त्यामुळे वादीला सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे वादीच्या अधिकाराचा विचार करता, मी मुद्दा क्र.३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादी सोबत दाव्याचा निकाल लागल्यापासून २ महिन्यांच्या आतमध्ये नांदावयास जावून वैवाहिक जीवनाची पुर्नस्थापना करावी असा आदेश देण्यात येतो.

३. वरील प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)**

13/8/26

**(ए.एच.तट्टु)**

दिनांक – १३.०८.२०२६.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर, सिल्लोड.